REGISTERED No. B. 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी
करावी.
व्यवस्थापक, अर्थ.
' दुर्गाधिवास ' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४
( टपाल हंशिल माफ )
किरकोळ अंकास
दोन आणे.

' अर्थ एव प्रधानः ' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

संपादक—प्रो. वा. गो. काळे ★ सहसंपादक—श्री. वा. काळे

वर्ष १० पुणें, बुधवार, तारीख ९ फेब्रुवारी, १९४४ अंक ६

## दि ब्रिटिश इंडिया जनरल इन्शुअरन्स कं. लि.

( स्थापना : १९१९ )

आम्ही आयुर्विम्याखेरीज करून आग, मरीन, अपघात, इत्यादींचे
सर्व प्रकारचे विमे स्वीकारतों.

—: चेअरमन व मॅनेजिंग डायरेक्टर :—
सर होमी मेहता, के. बी. ई., जे. पी.

पुणें शाखा :
मोति माणिक मॅन्शन,
लक्ष्मी रोड.

हेड ऑफिस :
मेहता हाऊस,
अपोलो स्ट्रीट, मुंबई.

## पुना गेस्ट हाऊस

१००, लक्ष्मी रोड, पुणें २.

Telephone
779




TELEGRAM
Guest House
Poona 2.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन
स्वत:ची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

गिरगांव
मुंबई नं. ४

## महिंद्रकर ब्रदर्स

तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार
चौक,
पुणें

# विविध माहिती

### जर्मनीची हानी

जर्मनीनें गेल्या सबंद महायुद्धांत आघाडीवर जेवढे सैनिक गमावले, त्यापेक्षाहि अधिक जर्मन सैनिक चालू युद्धांत आतापर्यंत कामास आले आहेत. ह्यांपैकी शेकडा ९० सैनिक रशियावरील युद्धांत मरण पावले. ब्रिटिश मंत्री, लॉर्ड सेल्बोर्न, ह्यांनी वरील माहिती नुकतीच सांगितली.

### सरकारी कारकुनांच्या पगारांत वाढ

कारकुनांच्या युद्धापूर्वीच्या पगाराचें मान सध्याच्या युद्धजन्य परिस्थितींत त्यांस आकर्षक वाटत नसल्यामुळें लायक लोक कामास मिळणें हिंदुस्थान सरकारास अवघड जात आहे. इतर ठिकाणच्या तत्सम नोकरांस ज्यास्त पगार मिळत आहे. सरकारी नोकरीची आकर्षकता कायम राखण्याचे दृष्टीनें कारकुनांचा सुरवातीचा पगार ४० रुपयांऐवजी ५० रुपये करण्याचा हिंदुस्थान सरकारचा विचार आहे. हिंदुस्थान सरकारनें ह्यासाठीं नेमलेले खास अधिकारी, मि. बी. सी. ए. कुक ह्यांनीं नुकतींच मुंबईमधील हिंदुस्थान सरकारच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशीं चर्चा केली.

### अ. भा. कारखानदार संघ

अ. भा. कारखानदार संघाचें चौथें वार्षिक अधिवेशन नागपूर येथें सर एम. विश्वेश्वरअय्या ह्यांचे अध्यक्षतेखाली २६ व २७ फेब्रुवारी रोजीं होणार आहे. सर माधवराव देशपांडे हे स्वागत समितीचे अध्यक्ष आहेत.

### कॉमन्स सभेस अध्यक्षांच्या खुर्चीची देणगी

ब्रिटिश कॉमन्स सभेची नवी इमारत बांधण्यांत येईल, तीन-मधील अध्यक्षांची खुर्ची ऑस्ट्रेलिया देणगी म्हणून ब्रिटिश सरकारास देणार आहे. ब्रिटिश सरकारनें ऑस्ट्रेलियाच्या देणगीचा स्वीकार केला आहे. सभागृहाचा नकाशा व लाकडाची निवड झाल्यावर खुर्चीची योजना केली जाईल.

### ब्रिटिश व अमेरिकन हितसंबंधी लोकांची हिंदुस्थान सरकारांतील वरिष्ठ जागीं नेमणूक

हिंदुस्थान सरकारनें मि. फ्रँक पार ह्यांस पोलादाचे कमिशनर, मि. मॅकलव् ह्यांस त्यांचे मदतनीस व मि. यंग ह्यांस कोळसा कमिशनर नेमलें आहे. ह्या तिघांचा ब्रिटिश व अमेरिकन उद्योग-धंद्यांशीं आजवर संबंध असल्यामुळें, ते हिंदुस्थान सरकारची नोकरी कितपत स्वामिभक्तीनें करतील ह्याबद्दल लोकांना काळजी, इतकेंच नव्हे तर शंका वाटणें संभवनीय आहे. ह्या गोष्टीकडे फेडरेशन ऑफ् इंडियन चेंबर्स ऑफ् कॉमर्स ॲन्ड इंडस्ट्रीनें हिंदुस्थान सरकारचें लक्ष वेधलें आहे. पोलाद व कोळसा ह्या धंद्यांच्या हितसंबंधाबाबतच त्यांचें कार्यक्षेत्र आहे, म्हणून काळजी जास्तच वाटते व त्यांची नेमणूक वरिष्ठ नोकरांच्या हिंदीकरणाच्या सरकारी धोरणास धरून नाहीं, असेंहि फेडरेशनमध्यें सरकारच्या नजरेस आणलें आहे.

### लैबेरियानें युद्ध पुकारलें.

लैबेरियानें २६ जानेवारी रोजीं जर्मनी व जपान ह्यांचे विरुद्ध युद्ध पुकारलें. आफ्रिकेच्या पश्चिम किनाऱ्यावर लैबेरिया देश आहे. त्याचें क्षेत्रफळ ४१ हजार चौ. मैल आहे. अमेरिकेंतील निग्रो लोकांची गुलामगिरी बंद केल्यावर त्यांना रहाण्यासाठीं लैबेरियाची योजना करण्यांत आली. सरकारी भाषा इंग्रजी आहे. देशांतील नागरिक बहुतेक सर्व निग्रो प्रॉटेस्टंट पंथाचे आहेत.

### ट्रेझरी बिलांवर १० आ. ४ पै व्याज

रिझर्व्ह बँकेनें गेल्या आठवड्यांत हिंदुस्थान सरकारचीं ८ कोटि रुपयांचीं ट्रेझरी बिलें विकलीं. त्यांवर व्याजाचा सरासरी दर द. सा. द. शे. १० आ. ४ पै एवढा पडला.

### जमीन गहाणाच्या बँकांचें एकत्रीकरण

ठाणें (पूर्व) व कुलाबा जिल्हा लँड मॉर्गेज बँक आणि ठाणें (पश्चिम) व मुंबई उपनगर जिल्हा को. लँड मॉर्गेज बँक लि. पालघर ह्या दोन जमीन-गहाणाच्या बँकांचें एकत्रीकरण होऊन त्या ह्यापुढें "ठाणें, कुलाबा व मुंबई उपनगर जि. को. लँड मॉर्गेज बँक लि. ठाणें" ह्या नांवानें व्यवहार करतील.

### कॅनडामधील रेड इंडियन

कॅनडामध्यें सुमारें १,२०,००० रेड इंडियन आहेत. श्वेतवर्णीयांचा व त्यांचा प्रथम संबंध आला तो रेड इंडियन वंशाच्या वृद्धीस घातुक ठरला, परंतु १८२५ नंतर त्यांची लोकसंख्या वाढूं लागली. त्यांचेवर लष्करी नोकरीची सक्ती आहे. कॅनेडिअन श्वेतवर्णीयांपेक्षां अधिक प्रमाणांत रेड इंडियन लोकांनीं स्वखुषीनें लष्करांत नोकरी पत्करली आहे, ह्यामुळें नोकरीच्या सक्तीबद्दल त्यांची तक्रार आहे. अमेरिकेंतील निग्रो लोकांच्या प्रश्नाइतका कॅनडांतील रेड इंडियन लोकांचा प्रश्न बिकट नाहीं. रेड इंडियनबद्दल कनेडिअनास तुच्छता वाटत नाहीं, असा मात्र त्याचा अर्थ नाहीं. "आम्हांस केवळ रेड इंडियन असें न मानतां कनेडिअनचा आम्हांस दर्जा द्या. सत्य, न्याय व राजनिष्ठा ह्यांचे आधारावर वर्णद्वेषाचें निर्मूलन करून एकजुटीचा कॅनडा निर्माण करण्यास आम्हांस सवड द्या" अशी त्यांची मागणी आहे.

### मुंबई कॉर्पोरेशनचें बजेट

मुंबई कॉर्पोरेशनच्या १९४४-४५ च्या अंदाजाप्रमाणें कॉर्पोरेशनचें अपेक्षित उत्पन्न ४ कोटि, ३०¾ लक्ष रुपये आहे.

### वस्तऱ्याच्या पाती व फाउन्टनपेन्स ह्यांच्या कमाल किंमती

वस्तऱ्याच्या पाती, सिगारेटस, फाउन्टनपेन्स, खेळण्याचे पत्ते, टेनिसचे चेंडू, गोल्फचे चेंडू, इत्यादींच्या कमाल किंमती हिंदुस्थान सरकारनें ठरवून दिल्या आहेत. निर्गत होणाऱ्या मालास हा ऑर्डिनन्स लागू नाहीं.

### हिंदुस्थान सरकारास १९४२–४३ मध्यें ११२ कोटि रुपये तूट

हिंदुस्थान सरकारास १९४२–४३ मध्यें १७७¾ कोटि रुपये उत्पन्न होऊन त्याचा खर्च २१४¾ कोटि रुपये झाला व निव्वळ तूट ११२ कोटि रुपयांची आली, असे आकडे हिंदुस्थान सरकारनें प्रसिद्ध केले आहेत. दुरुस्त अंदाज पत्रकांत ९४¾ कोटि रुपयांची तूट येईल अशी अपेक्षा होती. ताज्या आकड्यांत पुढें कांहीं किरकोळ दुरुस्त्या झाल्या, तरी त्यांनीं महत्त्वाचे फेरबदल होण्याचा संभव नाहीं. उत्पन्नाच्या बाजूस रेल्वेजकडून मिळालेले २० कोटि रुपये व पोस्ट आणि तार खात्याचा ४½ कोटि रुपयांचा वाढावा ह्या त्या बाबी आहेत. खर्चाच्या बाजूस २१४¾ कोटि रुपयांचा लष्करी खर्च दाखविण्यांत आला आहे.

### हिंदी गिरण्यांत हिंदी कपाशीचा उठाव

| | गाठी (१ गाठ = ४०० पौंड) |
|---|---|
| ऑक्टोबर, १९४२ | ३, १२, ६८१ |
| ऑक्टोबर, १९४३ | ३, ४०, ४६१ |
| सप्टेंबर-ऑक्टोबर, १९४२ | ६, ११, ६८३ |
| सप्टेंबर-ऑक्टोबर, १९४३ | ७, ०१, ३५५ |

अनुक्रमणिका


| | पृष्ठ | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ विविध माहिती | ... ४२ | स्वर्गा—जपानच्या हातांतील ब्रिटिश युद्धकैद्यांचा छळ—त्यामुळें मित्रराष्ट्रांचा निश्चय दृढतर होणार— हिटलरी वक्तव्य— युद्धोत्तर हिंदी शिक्षणाची योजना. | |
| २ आर्थिक अभिवृद्धीची योजना | ... ४३ | ५ महाराष्ट्र बँकेची प्रगति | ... ४६ |
| ३ द. आफ्रिकेंतील निग्रो मजूर | ... ४४ | ६ प्रेसिडेन्सी इं. बँकेचें गेल्या वर्षांतील कार्य | ... ४७ |
| ४ स्फुट विचार उद्योगधंद्यांत नवें भांडवल—कारखान्यांचें प्राधान्य—हिंदी पेठेबाबत ब्रिटन-अमेरिका | ४५ | | |



# अर्थ

बुधवार, ता. ९ फेब्रुवारी, १९४४


## आर्थिक अभिवृद्धीची योजना

(२)

सर पुरुषोत्तमदास ठाकुरदास प्रभृति पुढाऱ्यांनीं हिंदुस्थानच्या आर्थिक अभिवृद्धीची योजना तयार करून देशापुढें मांडली आहे, तिचे पाच भाग आहेत. पहिला विभाग प्रास्ताविक स्वरूपाचा आहे आणि त्याचा परामर्श आम्हीं या विषयावरील मागील लेखांत घेतला आहे. हिंदी जनतेचें किमान रहाणीचें मान कोणत्या दर्जाचें असावें आणि तें तसें कां असावें ह्याचा विचार दुसऱ्या भागांत केलेला आहे. तिसऱ्या भागांत आर्थिक योजनेचें स्पष्टीकरण आहे. चौथ्यांत तिला लागणाऱ्या पैशाविषयीं विवेचन आहे आणि शेवटच्या विभागांत अभिवृद्धि कशी क्रमाक्रमानें घडवून आणावी ह्या विषयींची माहिती देण्यांत आली आहे. सर्वसाधारण जनतेची रहाणी सुधारून अधिक आरोग्यकारक व सुखदायी व्हावी हा आर्थिक अभिवृद्धीचा मूळ हेतु असल्यानें ह्या महत्त्वाच्या बाबीच्या चर्चेस अग्रस्थान देण्यांत आलें आहे हें योग्यच आहे. हिंदुस्थान देश कृषिप्रधान आहे तरी अनेक लोकांस पुरेसें अन्न मिळत नाहीं आणि त्याहिपेक्षा अधिकांस मिळणारें अन्न निकस असतें हें आतां सिद्ध झालें आहे. प्रत्येक लहान-मोठ्या व्यक्तीस पुरेसें व सकस अन्न मिळण्यास दर डोक्यास वार्षिक खर्च आणि किमान उत्पन्न ६५ रुपये असावयास पाहिजे असें हिशेबानें ठरतें आणि म्हणून ३९ कोटि लोकसंख्येच्या अन्नाप्रीत्यर्थ प्रतिवर्षी २१०० कोट रुपये खर्चीं पडले पाहिजेत असें योजनेच्या पुरस्कर्त्यांनीं ठरवलें आहे. अन्नाच्या खालोखाल जनतेची गरज कपड्यांविषयींची आहे. सबंध जगांतील लोकांचा विचार केल्यास १९२८–२९ सालच्या परिस्थितीवरून दर माणशीं कापसाच्या कापडाचा सरासरी खप ४२ वार होता असा हिशेब होतो. हिंदुस्थानांतली १९९९ मधली सरासरी १६ वार होती. ह्या देशाच्या निरनिराळ्या विभागांत कापडाचा वापर भिन्न भिन्न आहे. तथापि एकंदरीनें पहातां प्रत्येक माणशीं सालीना तें ३० वार्ड पुरवतां आलें तर तें समाधानकारक होईल असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या हिशेबानें १९४१ च्या खानेसुमारीच्या लोकसंख्येस ११६७ कोटिवार कापड लागेल आणि दर वारास साडेतीन आणे प्रमाणें कापडाच्या एकूण पुरवठ्यास २५५ कोटि रु. खर्च येईल. योजनाकर्त्यांचा हा आकडा प्रत्यक्ष वस्तुस्थितींत तिप्पट-तरी होईल.

अन्न आणि वस्त्र ह्यांच्या नंतर रहाण्याचीं घरें, आरोग्य, औषधपाणी, सार्वजनिक आरोग्य व लोकशिक्षण त्यांचा विचार येतो आणि त्यांची समाधानकारक व्यवस्था होण्यास किती किमान खर्च येईल ह्याचा अंदाज करण्यांत आला आहे. प्रत्येक माणशी शंभर चौरस फूट एवढी बंदिस्त जागा जनतेस पुरवावयाची म्हटल्यास १४४० कोटि रुपये खर्चले पाहिजेत आणि साडेसात टक्के व्याजानें प्रतिवर्षी २५८ कोटि रुपये खर्च येईल. आरोग्याविषयीं सध्याची व्यवस्था अत्यन्त अपुरी आहे हें दर्शवणारे आकडे योजनाकारांनीं दिले आहेत आणि शुद्ध पाण्याचा पुरवठा, दवाखाने, रुग्णालयें ह्यांच्या प्रीत्यर्थ शहरांत व खेडेगावांत जरूर तो खर्च केला पाहिजे असें म्हणून प्रस्तुत बाबींवर किती पैसा पुरवला गेला पाहिजे ह्याचा अंदाज त्यांनीं दिला आहे. सार्वजनिक आरोग्य व पाणीपुरवठा यांस रु. १०० कोटींचा खर्च येऊन प्रतिवर्षी साडेसात कोटि रुपयांची तरतूद करावी लागेल. प्रत्येक खेडेगावांत एक दवाखाना घालण्यास इमारती व प्राथमिक सामुग्री ह्यांचा भांडवली खर्च १३२ कोटी रुपये येईल आणि दरवर्षी तितकीच रक्कम खर्चली जावी लागेल. प्रसूतिगृहें, विशिष्ट रोगांनीं पीडितांकरितां खास गृहें ह्यांचीहि तरतूद करावी लागेल. ह्या आरोग्यविषयक निरनिराळ्या बाबींप्रीत्यर्थ एकूण भांडवल २८१ कोटि व वार्षिक खर्च १८५ कोटि लागेल. प्राथमिक व प्रौढ शिक्षणाचा प्रसार झाल्यावाचून कोणतीच प्रगति शक्य नाहीं ही गोष्ट आतां सर्वमान्य झाली आहे आणि ह्याकरितां शाळागृहें व शिक्षक ह्यांची पुरी तजवीज केली गेली पाहिजे. ह्या संबंधांतील हिशेबावरून असा अजमास करण्यांत आला आहे कीं, मुलगे व मुली ह्यांस ६ ते ११ ह्या वयांत प्राथमिक शिक्षण सक्तीनें देण्यास भांडवली खर्च ८६ कोटि व चालू वार्षिक खर्च ८८ कोटि रुपये इतका करावा लागेल आणि प्रौढ शिक्षणासाठीं आणखी ६६ कोटि रुपये लागतील.

जनतेच्या किमान रहाणीस सरासरीनें एकूण खर्च किती येईल आणि त्याकरितां राष्ट्राची वार्षिक प्राप्ती किती वाढली पाहिजे ह्याची कल्पना वर दिलेल्या आकड्यांवरून येईल. ह्या निरनिराळ्या बाबींसाठीं राष्ट्रास स्थूल मानानें वार्षिक किती रकमा आवश्यक आहेत हें दर्शवणारे आकडे खालीं दिले आहेत.

| बाब | खर्च होण्यास लागणारी प्राप्ती (कोटि रुपये) |
|---|---|
| अन्न खर्च ... ... | २,१०० |
| कापड ,, ... ... | ... २६० |
| घरांचा चालू खर्च ... ... | ... २६० |
| आरोग्याचा ,, ... ... | ... १९० |
| प्राथमिक शिक्षणाचा ... ... | ... ९० |
| एकूण खर्च ... ... | ... २,९०० |

हिंदी जनतेच्या किमान प्रतीच्या रहाणीसाठीं दर माणशी निदान ७४ रुपये इतकी वार्षिक प्राप्ती आवश्यक आहे हें वरील आकड्यांवरून सिद्ध होतें. १९३१-३२ सालापासूनचा हिंदी दर

माणशीं उत्पन्नाचा आकडा ६५ रुपये आहे. गेल्या बारा वर्षांत लोकसंख्येंत भर पडली असल्यानें हा सरासरीचा आकडा, विशेष आर्थिक प्रगतीच्या अभावीं, ह्याहिपेक्षा कमी करावा लागेल. युद्ध-समाप्तीनंतरच्या काळांत पदार्थांच्या किंमती वगैरे बाबतींतले होणारे फरक पुढें हिशेबांत घ्यावे लागतील. तथापि, स्थूल मानानें पहातां हिंदी जनतेची सध्याची प्राप्ती आणि किमान दर्जाच्या समाधानकारक रहाणीसाठी जरूर असलेलें दर माणशी उत्पन्न ह्यांचेमध्यें मोठें अंतर आहे ह्यांत शंका नाहीं. शिवाय, उत्पन्नाचे आकडे सरासरीचे आहेत आणि सामान्य जनतेची रहाणी त्यां-वरून दिसणाऱ्या स्थितीपेक्षा निकृष्ट असली पाहिजे हें येथें विस-रून चालतां येणार नाहीं. ह्या परिस्थितीवर उपाय म्हणून आर्थिक अभिवृद्धीची योजना तयार करण्यांत आली आहे. दर माणशी उत्पन्न वाढवण्याचे मार्ग तीमध्यें सुचवण्यांत आले आहेत.

## दक्षिण आफ्रिकेंतील नीग्रो मजूर

### ब्रिटिश वृत्तपत्रांची ब्रिटिश कामगिरीची प्रशंसा

"दक्षिण आफ्रिकेचें श्वेतवर्णीय मनुष्यबळ २२ लक्ष, त्या देशाचा विस्तार व त्यांतील नैसर्गिक संपत्ति ह्यांचे मानानें अत्यंत अपुरें आहे. त्या देशांतील मजूर वर्ग म्हणजे बंटू (निग्रो) लोक असून त्यांची संख्या ७५ लक्ष आहे. तेच सर्व शारीरिक कामें करतात. सोन्याच्या खाणींत काम करण्यासाठी ते ९ महिने ते ५ वर्षें मुदतीनें येतात व करार संपल्यावर त्यांना परत धाडण्यांत येतें. खाणींत कामावर असतांना त्यांना रस्त्यावर भटकूं दिलें जात नाहीं. कडक शिस्त राखण्यांत येते. शहरांत नोकर, झाडू, वगैरे कामें करणारांची रहाण्याची सोय शहराचे कडेस स्वतंत्र केलेली असते येथेंहि त्यांचेवर पोलिसांची देखरेख असते. आपली हद्द सोडून शहरांत जाणाऱ्या प्रत्येकाला परवान्याचा पास दाखवावा लागतो. दर रविवारीं संध्याकाळीं असें जाण्यासाठी मालक लोक बहुधा पास देतात, परंतु ते देण्याची मालकांवर सक्ती नाहीं. निग्रो लोकांना शस्त्रें देणें कायद्यास संमत नाहीं. त्या कारणानें युद्धपरिस्थितींतील त्यांचीं कामें शांततेच्या वेळच्या कामापेक्षा विशेष वेगळीं नाहींत. निग्रो हा खराखुरा मजूर आहे. दक्षिण आफ्रिकेच्या फौजेंत कांहीं निग्रो आहेत, परंतु लढणाऱ्या पल-टणींत त्यांचा समावेश नाहीं. निग्रो लोक ब्रिटिशांच्या पूर्णपणें बाजूचे आहेत. बोअर लोकांना निग्रोंचा पूर्ण तिटकारा आहेत व निग्रो लोकांना पुन: गुलामगिरींत लोटण्यास ते तयार होतील, परंतु ब्रिटिश तसें करूं देणार नाहींत. ब्रिटिशांची सहानुभूति नसती तर बोअर लोकांनी निग्रो मजुरांस केव्हांच नामशेष केलें असतें; तथापि, बोअर व निग्रो ह्यांतील मतभेद तूर्त बाजूस ठेवण्यांत आले असून, काळे पांढरे सर्व लोक लोकशाहीसाठी एकजुटीनें लढत आहेत."

—ए. वॉ. वीकली

### हिंदी रेलवेजचें उत्पन्न

गेल्या एप्रिल महिन्याच्या प्रारंभापासून डिसेंबर अखेरच्या नऊ महिन्यांत हिंदुस्थान सरकारच्या हिशेबांत येणाऱ्या रेलवेजचें एकूण उत्पन्न १३० कोटि रुपये झालें. त्या पूर्वीच्या सालांतील तत्सम अवधींतल्या उत्पन्नापेक्षा हा आकडा १७ कोटि ८७ लक्ष रुपयांनीं अधिक आहे. १९४१-४२ च्या मानानें तो आकडा ३२ कोटि रुपयांनीं मोठा आहे.


॥ दत्त कंपनी ॥

७३५ शुक्रवार पेठ, पुणें १. दाणेआळी पोलिसगेटाजवळ

सर्व तऱ्हेचे काटे, वजनें व मापें, वेळेवर

रिपेअर करून मिळतील.

# दि इंडियन रियल इस्टेट कॉर्पोरेशन लिमिटेड

बालमुकुंद रोड, रविवार पेठ, पुणें

सर्व तऱ्हेच्या बांधकामाचीं कॉन्ट्रॅक्टस्, व लँड डेव्हलपमेंटच्या योजनांचे व्यवहार होतात.

—ठेवी घेणें आहेत—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| मुद्दत | ६ | महिने | दर ४ | टक्के |
| | १२ | " | ४॥ | " |
| | २४ | " | ५ | " |

माहिती व अर्जाकरितां मॅनेजर यांस लिहा.

# दि बँक ऑफ महाराष्ट्र, लि.

हेड ऑफिस : पुणें शहर.

स्थानिक शाखा : डेक्कन जिमखाना, पुणें ४.

मुंबई शाखा : दलाल स्ट्रीट, फोर्ट, मुंबई.

जळगांव शाखा : नवी पेठ, जळगांव.

नागपूर शाखा : गोखले बिल्डिंग, सिताबर्डी, नागपूर.

भांडवल

| अधिकृत व विक्रीस काढलेलें | खपलेलें | वसूल झालेलें |
|---|---|---|
| रु. १०,००,००० | रु. ६,८०,६५० | रु. ३,४०,३२५ |

एकूण खेळतें भांडवल रु. ७०,१०,०००

बँकेच्या शेअरवर डिसेंबर १९४२ अखेर ४½% करमाफ डिव्हि-डंड दिलें गेलें. बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात. शेअर व सरकारी रोखे यांची खरेदी-विक्री कसोशीनें करून दिली जाते.

सी. व्ही जोग,
B. Com., Cert. A. I. B. C. A. I. I. B.
मॅनेजर

# साखरआंबा, मोरआवळा—

सफरचंदाचा, गाजराचा, आवळ्याचा, बेलफळाचा, महाळुंगाचा, आल्याचा, हिरड्याचा वगैरे.

द. ना. हेजीब, २० शुक्रवार, पुणें.

# स्फुट विचार

## उद्योगधंद्यांत नवें भांडवल

पदार्थ विकत घेण्याच्या सामर्थ्याचा म्हणजे पैशाचा ओघ सरकारच्या तिजोरीकडे वळावा आणि त्याचा महागाई उत्पन्न करणारा परिणाम हतबल करावा ह्या हेतूनें हिंदुस्थान सरकार अनेक उपाय योजीत आहे. औद्योगिक व व्यापारी मंडळयांमध्यें चालण्यांत येणाऱ्या भांडवलाचें नियमन करणें हा त्यांपैकीच एक मार्ग आहे. युद्धपरिस्थितीमुळेंच नवीन उद्योग चालू करणें किंवा जुन्यांमध्यें जादा भांडवल घालणें ह्या गोष्टी आवश्यक होतात आणि त्यांचे मार्गांत अडथळे उत्पन्न करणें हें केव्हांहि श्रेयस्कर होणार नाहीं. परंतु ज्यांची युद्धपरिस्थितींत आवश्यकता नाहीं किंवा ज्यांच्या स्थापनेनें अथवा विस्तारानें व्यवहारांत पैसा निष्कारण खेळत रहाण्याचा संभव आहे अशा भांडवली योजनांची छाननी केली जाणें अयोग्य नाहीं. नवीन भांडवलाची गुंतवण आपापल्या व्यवहारांत करूं इच्छिणाऱ्या कंपन्यांनीं हिंदुस्थान सरकारकडे अर्ज पाठवून आगाऊ मान्यता मिळवली पाहिजे अशी योजना सध्या अंमलांत आहे. तिच्या प्रारंभापासून पहिल्या सहामाहींत नव्या व जादा भांडवलाचे संबंधांत काय घडामोडी झाल्या ह्याची माहिति प्रसिद्ध झाली आहे ती बोधप्रद आहे.

## कारखान्यांचें प्राधान्य

ह्या अवधींत सरकारकडे गेलेले पाचशे अर्ज मान्य झाले आणि त्यांचे अन्वयें १५ कोटि रुपयांच्या भांडवलाच्या व्यवहारांस परवानगी देण्यांत आली. कारखानदारीच्या स्वरूपाचे धंद्यांची अर्जदारांमध्यें ५६४ एवढी संख्या होती आणि त्यांची मागणी २० कोटि रुपये भांडवलाची होती. ह्या एकूण अर्जांपैकीं ६६ म्हणजे १२ टक्के नामंजूर झाले आणि त्यामुळें मागणीपैकीं २२ टक्के भांडवलास परवानगी नाकारण्यांत आली. कापसाच्या गिरण्यांचे विषयीं ६८ अर्ज होते आणि त्यांत ४ कोटि रुपये भांडवलाबद्दलची मागणी होती, ती मान्य झाली. लोखंड व पोलाद ह्यांच्या बनावटीबाबत १ कोटि, ७० लक्ष रुपयांचे ५७ अर्ज मंजूर झाले. रसायनें, औषधें वगैरेसाठी दीडकोटीच्या ६३ मागण्या मान्य झाल्या. चित्रपटांचे धंद्याविषयीं १२ लक्ष रुपयांच्या १५ अर्जांस मान्यता मिळाली. महत्त्वाच्या धंद्यांसंबंधांतले ठळक आकडे येथें देण्यांत आले आहेत; त्यांवरून युद्धपरिस्थितींतल्या औद्योगिक प्रगतीच्या प्रवृत्तीची कल्पना येण्यासारखी आहे. युद्धकाळांत दुर्मिळ होणाऱ्या व प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीतीनें लढाऊ तयारीस उपयोगी पडणाऱ्या जिनसांच्या उत्पादनास सहाय्य व्हावें अशा बेतानें भांडवलाच्या औद्योगिक गुंतवणुकीस मान्यता दिली जात आहे हें त्यांवरून दिसेल.

## हिंदी बाजार पेठेबाबत ब्रिटन—अमेरिका स्पर्धा

युद्धोत्तर काळांत आवश्यक असलेल्या आंतरराष्ट्रीय सहकार्याची भाषा एकीकडे बोलली जात आहे आणि त्याच वेळीं दुसरीकडे व्यापार व उद्योगधंदे ह्यांचे संबंधांत इंग्लंड व अमेरिका ह्यांचेमध्यें व्हावयाच्या स्पर्धेविषयीं ओरडाहि चालली आहे.. युद्ध संपल्यावर आपल्या व्यापाराचें बस्तान कसें बसेल आणि जागतिक पुनर्घटनेंत स्वतःस मोठा हिस्सा कसा मिळेल ह्याची चिंता ब्रिटिश देशांतील धंदेवाल्यांस लागून राहिली आहे. युद्ध चालू असतांना लढाऊ जहाजें इंग्लंडनें बांधावीं आणि व्यापारी जहाजें बांधण्याचें काम अमेरिकेनें करावें अशी श्रमविभागाची तजवीज ह्या दोन राष्ट्रांनीं केली आहे. पण युद्धोत्तर काळांत जागतिक व्यापारांत अमेरिकेचें वर्चस्व ह्या व्यवस्थेमुळें होऊन इंग्लंड त्या बाबतींत मागें पडेल अशी भीति ब्रिटिश नाविक धंदेवाल्यांस वाटत आहे. वैमानिक वहातुकीचे संबंधांतहि अशाच तऱ्हेचे विचार ब्रिटिश धंदेवाल्यांच्या डोक्यांत घोळत आहेत. हिंदुस्थानच्या व्यापारांत इंग्लंडला आज अग्रेसरत्व आहे. तें ह्यापुढें हिरावून घेण्याचा पद्धतशीर प्रयत्न अमेरिकन व्यापारी करीत असल्याची तक्रार ब्रिटिश वृत्तपत्रांतून केली जात आहे. इंग्लंडनें अमेरिकेचा किंवा गिरवून हिंदुस्थानशी होणारा परराष्ट्रीय व्यापार स्वतःचे हातीं ठेवण्याचा व्यवस्थित यत्न केला पाहिजे असें आग्रहपूर्वक सांगण्यांत येत आहे. हिंदुस्थानशीं होणाऱ्या नाविक वहातुकीचा योग्य हिस्सा हिंदी स्वदेशी मंडळयांच्या हातीं येण्यास येथील सरकारनें जरूर तें उत्तेजन द्यावें अशी मागणी आज कित्येक वर्षें चालू आहे. आर्थिक पुनर्घटनेच्या योजना आखण्याचें काम दिल्ली येथें मध्यवर्ती सरकारच्या मार्फत चाललें आहे, त्यांत नाविक आणि वैमानिक वहातुकीचा प्रश्न ह्या देशाच्या दृष्टीनें समाधानकारक रीतीनें सोडवला जाण्याची व्यवस्था होणें अगत्याचें आहे. युद्धोत्तरकाळांत व्यापारी व औद्योगिक स्पर्धा मोठ्या प्रमाणावर होण्याचा रंग दिसत आहे आणि तीमध्यें हिंदुस्थानाच्या हिताचें पूर्ण रक्षण केलें जाण्याची तरतूद एव्हांपासून दूरदृष्टीनें व निश्चयानें झाली पाहिजे.

## जपानच्या हातांतील ब्रिटिश युद्धकैद्यांचा छळ

जपानच्या हातांतील ब्रिटिश युद्धकैद्यांच्या छळासंबंधीं व वाईट वागणुकीसंबंधीं माहिती ब्रिटिश परराष्ट्रमंत्री, मि. ईडन, ह्यांनीं कॉमन्स सभेंत नुकतीच सांगितली. युद्धकैद्यांच्या पत्रांतील मजकुरावरून त्यांची स्थिति समाधानकारक होती असें दिसलें तरी प्रत्यक्ष परिस्थिति भयंकर आहे, असें ते म्हणाले. युद्धकैद्यांपैकी शेंकडा ८० ते ९० लोक फिलिपाइन बेटें, नेदरलंड्स ईस्ट इंडीज, बोर्निओ, ब्रह्मदेश, मलाया, सयाम व इंडोचायना येथें आहेत. त्यांच्या तळांची तटस्थांनीं पहाणी करण्यासहि जपानची तयारी नाहीं. युद्धकैद्यांची संख्या व नांवेंहि जपाननें कळविलेलीं नाहींत. ब्रिटिश सरकारला मिळालेल्या माहितीप्रमाणें ब्रिटिश साम्राज्याचे हजारो युद्धकैदी सयाममध्यें ठेवलेले आहेत, त्यांच्या खाण्यापिण्याची व औषधपाण्याची अत्यंत आबाळ होत आहे. रेल्वे व रस्ते ह्यांचें बांधकाम त्यांचेकडून करवून घेण्यांत येत आहे. त्यांची प्रकृति ढासळत असून, त्यांपैकीं बहुसंख्य अत्यंत आजारी आहेत व हजारो युद्धकैदी मरण पावले आहेत. हाँगकाँग, फोर्मोसा, शांघाई, कोरिया व जपान येथील युद्धकैद्यांचे तळ तटस्थांनीं पहाण्यास जपान सरकारनें हरकत घेतलेली नव्हती. तेथील परिस्थिति कमी असमाधानकारक आहे अशी माहिती मिळते. केवळ आंतरराष्ट्रीय कराराचाच भंग जपाननें चालविला आहे, असें नसून माणुसकीच्या साध्या तत्त्वाचाहि त्यास विसर पडलेला आहे, असें मि. ईडन म्हणाले. स्विस सरकारचे मार्फत ब्रिटिश सरकारनें जपानकडे जोराच्या तक्रारी केल्या, त्यांस आलेलीं उत्तरें असंतोष करणारीं व असमाधानकारक होतीं. सुधारलेल्या राष्ट्रानें आपल्या युद्धकैद्यांच्या जीवितासाठी व आरोग्यासाठी काय केलें पाहिजे,

ह्याची जपानला जाणीव असूनहि तो असा वागत आहे. "जपानच्या लष्करी अधिकाऱ्यांच्या कृत्यांचा विसर पडणार नाहीं, हें जपानी सरकारनें वेळींच ध्यानांत आणावें" असा इशारा मि. ईडन ह्यांनीं दिला.

### त्यामुळें मित्रराष्ट्रांचा निश्चय दृढतर होणार

लढाईंत हातीं सांपडलेल्या प्रतिस्पर्ध्यांच्या सैनिकांस जपानी सरकार अमानुष, क्रूर व रानटी प्रकारानें वागवीत आहे. ह्यासंबंधांत प्रसिद्ध झालेली माहिती तिटकारा व त्वेष उत्पन्न करणारी आहे. युद्ध झालें तरी त्यांतील वागणुकींना कांहीं सर्वमान्य नियम आहेत. त्यांचें उल्लंघन जपान बेमुर्वतपणानें करीत आहे. मित्र राष्ट्रांनीं ह्याविषयीं मागेंच नापसंती व्यक्त केली होती आणि तक्रारीहि केल्या होत्या. कैद्यांचीं नांवें त्यांच्या राष्ट्रीय सरकारास कळवणें, त्यांस पत्रव्यवहाराच्या सवलती देणें, रेडक्रॉसच्यामार्फत होणाऱ्या त्यांच्याविषयींच्या कार्यास मदत करणें, इत्यादि साध्या शिष्टाचाराच्या गोष्टी आहेत आणि त्या आधुनिक काळांत सर्वत्र प्रचारांत आहेत. पण जपानी सरकारानें आपल्या धुंदींत त्यांस धाब्यावर बसवलें आहे. ह्या बाबतींतल्या जपानी दुष्कृत्यांच्या हकीकती बाहेर येत आहेत त्या अत्यंत किळसवाण्या आहेत आणि त्या विश्वसनीय असल्यानें त्यांची सारवासारव करणें जपानला शक्य नाहीं. जगाची नवीन घडी बसवण्याच्या गप्पा जर्मनी व जपान ह्यांमधील पुढारी मारीत आहेत, पण त्यांचे दुष्ट उद्देश आणि दुर्वर्तन ह्यांची चांगली कल्पना जगास आली आहे हें त्यांनीं खूप समजावें. दगलबाजी करून जिंकलेले एशिया खंडांतील प्रदेश जपानला पचणार नाहींत आणि त्याच्या अमानुष वर्तनाच्या हकीकतींनें ह्या शत्रूचा पूर्ण बीमोड करण्याचा मित्रराष्ट्रांचा निश्चय अधिक दृढ होणार आहे. हिंदी जनता आपला कावा उत्कृष्ट रीतीनें जाणत आहे हें त्या राष्ट्राच्या पुढाऱ्यांनीं लक्षांत ठेवावें.

### हिटलरी वक्तव्य

हिटलरच्या प्रकट भाषणांची लांबी व खोली हीं अलीकडे कमी कमी होत आलीं आहेत यावरून जर्मनीच्या खालावलेल्या लढाऊ परिस्थितीची कल्पना येण्यासारखी आहे. स्वतःच्या वर्चस्वाच्या स्थापनेचा अकरावा वाढदिवस साजरा करण्याच्या निमित्तानें जर्मन जनतेस उद्देशून त्यानें जें भाषण केलें त्यांत नेहमींचा चढेलपणा, पाल्हाळ किंवा चढाईची वृत्ती यांचा जवळ जवळ अभावच होता. पूर्व आघाडीवर लालसेनेच्या चढाईपुढें टिकाव न लागल्यामुळें जर्मन फौजा मागें हटत आहेत. जर्मनींतील प्रमुख शहरांवर प्रत्यहीं होणाऱ्या ब्रिटिश व अमेरिकन वैमानिक हल्ल्यांमुळें जर्मन लोक त्रस्त झाले आहेत. इटालिअन आघाडीवरहि जर्मन सेनानींच्या पदरीं अपयशच पडत आहे. अशा स्थितींत हिटलर चढाईची दर्पोक्ति कशी उच्चारणार ? युरोपांतील राष्ट्रांचें बॉल्शेव्हिकांपासून रक्षण करण्याचें पवित्र कार्य जर्मनीनें स्वीकारलें असून त्यांत आपण अखेर यश मिळवणार अशी नाझींची अढळ श्रद्धा असल्याचें सांगून हिटलरला आपल्या लोकांस धीर द्यावा लागला आहे. असल्या भाषणानें जर्मन जनतेचें सांत्वन कसें होणार आणि तिचा खचत असलेला उत्साह कसा जागृत होणार हें समजणें कठीण आहे. नात्सी पक्षाची जर्मन जनतेवर भक्कम पकड आहे, तिच्या आधारावरच केवळ विसंबून हिटलरला युद्धाचें होमकुंड पेटत ठेवावें लागत आहे. मि. क्लेमंट ॲटली ह्यांनीं ह्या गोष्टीचा एका भाषणांत उल्लेख करून नात्सींची प्रतिकारशक्ति नष्ट होईपर्यंत प्रस्तुत युद्ध जिंकतां येईल अशी कल्पना कोणीहि करून घेऊं नये असें ब्रिटिश जनतेस बजावलें, त्याचें रहस्य लक्षांत येणें आवश्यक आहे. हिटलरशाही अजून नष्ट व्हावयाची आहे आणि खरें अवघड युद्धकार्य पुढेंच आहे अशी सावधगिरीची सूचना त्यांनीं केली आहे.

### युद्धोत्तर हिंदी शिक्षणाची योजना

हिंदुस्थान सरकारचे शिक्षण सल्लागार, मि. सार्जंट, ह्यांची चाळीस वर्षांत पुऱ्या व्हावयाची शिक्षणप्रसाराची योजना प्रसिद्ध झाल्यापासून ह्या विषयाच्या चर्चेस चालना मिळाली आहे. सेंट्रल बोर्ड ऑफ एज्युकेशननें त्या योजनेच्या आधारानें स्वतःच्या सूचना तयार करून त्या व्हाइसरॉयांच्या कार्यकारी मंडळाच्या पुनर्घटना समितीकडे पाठविल्या आहेत. राष्ट्रीय शिक्षणाची संपूर्ण योजना अमलांत येईल तेव्हां तिला २७७ कोटि रुपये खर्च येईल आणि चाळीस वर्षें लागतील. पहिलीं पांच वर्षें पूर्वतयारी व प्रचार ह्यांत घालवावीं लागून सात पंचवार्षिक हप्त्यांनीं ती पुरी केली जावी असें बोर्डाचें म्हणणें आहे. सहा ते चवदा वर्षांच्या मुलांस आणि मुलींस प्राथमिक व मध्यम प्रतीचें शिक्षण सक्तीनें देण्यांत आलें पाहिजे अशी त्यांची सूचना असून वर्धा शिक्षण योजनेंतलें हस्तव्यवसायाचें तत्त्व त्यानें मान्य केलें आहे. मुलांनीं स्वतः बनवलेल्या वस्तूंच्या विक्रीचा पैसा येईल त्यामधून शिक्षणाचा खर्च भागवण्याची वर्धा योजनेंतली कल्पना मात्र बोर्डास पसंत नाहीं. प्राथमिक शिक्षणांत इंग्रजी भाषेच्या अभ्यासास स्थान असूं नये आणि स्थानिक अपवाद सोडल्यास हाच नियम मध्यम दर्जाच्या शिक्षणक्रमास लागू करावा असा त्याचा आग्रह आहे. शिक्षणाचा चांगुलपणा कर्तबगार शिक्षकांवर अवलंबून असल्यानें शिक्षकांचा दर्जा व त्यांचें वेतन ह्यांत सुधारणा झाल्या पाहिजेत आणि स्त्रीशिक्षकांची संख्या वाढवली पाहिजे असेंहि त्यानें म्हटलें आहे. ह्या प्रकारची शिक्षणाची व्यवस्था झाल्यास तिला दर वर्षी २०० कोटि रुपयांचा खर्च येईल. हायस्कुलांत पात्रता असलेलीं मुलेंच निवडून घ्यावीं आणि त्यांत यांत्रिक व धंदेविषयक शिक्षणाची शाखा असावी. ह्या व्यवस्थेस वर्षाचे ५० कोटि रुपये लागतील. विश्वविद्यालयांस द्यावयाच्या सार्वजनिक ग्रँटसची योग्य वाटणी करण्यासाठी एक स्वतंत्र कमिशन असावें. ह्याबाबतच्या बोर्डाच्या योजनेचा वार्षिक खर्च पावणे सात कोटि रुपये होईल.

### महाराष्ट्र बँकेची प्रगति

बँक ऑफ महाराष्ट्र लि. ला ३१ डिसेंबर, १९४३ अखेर संपलेल्या वर्षी ३६ हजार रुपये निव्वळ नफा झाला. त्यांतून भागीदारांना गतवर्षीप्रमाणेंच ४½% करमाफ डिव्हिडंड द्यावें अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. रिझर्व्ह फंडांत १५ हजार रुपयांची भर पडणार आहे. अहवालाचें वर्षी बँकेनें जळगांव व नागपूर येथें शाखा उघडल्या. स्वतःच्या इमारतीकरितां बँकेनें १ लक्ष, ५ हजार रुपयांस जागा खरेदी केली आहे. हिंदुस्थान सरकारनें कांहीं अटींवर ठरलेले भाग विकण्याची बँकेस परवानगी दिली आहे व त्या अटीप्रमाणें आर्टिकल्समध्यें सुधारणा करण्यांत यावयाची आहे. बँकेचें खेळतें भांडवल ७२½ लक्ष रुपयांवर गेलें आहे.

## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रिअल बँक लि., पुणें

[ अध्यक्ष श्री. रा. ग. रा. साठे, ह्यांनीं ता. ६ फेब्रुवारी रोजीं ७ व्या वार्षिक साधारण सभेचे वेळीं केलेलें भाषण. ]

आज आपल्या बँकेच्या ७ व्या साधारण सभेच्या प्रसंगीं मी आपलें स्वागत करतों. चालूं सालींही बँकेनें बराच पुढचा टप्पा गांठला आहे. प्रगतीचे कांहीं ठोकळ आकडे आपल्या मुद्दाम निदर्शनास आणतों.

| | | |
|---|---|---|
| चालूं भांडवलांत वाढ रु. | ८,८७,००० | ९० टक्के. |
| खात्यांचे संख्येंत वाढ | ७५९ | ६४ ,, |
| वसूल भांडवलांत वाढ रु. | ३२,९४५ | ४२ ,, |
| नफ्यांत वाढ. | | तिप्पट |

बँकेचा व्यवहार नेहमीप्रमाणेंच शक्य त्या बाबतींत काटकसरीचा पण जरूर त्या बाबतींत–उदाहरणार्थ नोकर लोकांस बोनस व महागाई भत्ता–सढळ असाच ठेवण्यांत आला आहे.

चालूं सालीं खर्चाचें प्रमाण ·८२% होतें. तेंच गेल्या वर्षी १·२% होतें.

• आपली बँक केवळ नफा मिळविण्याच्या हेतूनें निघालेली नसून कांहीं विशिष्ट उदात्त हेतू पुढें ठेवून स्थापन करण्यांत आली आहे, हेंही आपणांस माहीत आहेच, व सुरवातीपासून संचालक मंडळाचें धोरणही त्याच हेतूस धरून आखण्यांत आलें आहे. आपणांस कळविण्यास आनंद वाटतो कीं चालूं सालीं आपल्या बँकेनें केलेल्या एका व्यवहारामुळें महाराष्ट्राच्या आर्थिक व्यवहारांत एक क्रांतिकारक घटना निर्माण केली व तो व्यवहार म्हणजे " कॉमनवेल्थ कंपनी "स दिलेलें जीवदान–नुसतेंच जीवदान नव्हे तर महाराष्ट्रांतच तिचें वास्तव्य कायम राखणें. या व्यवहारांत एक अतिशय मोठी जोखीम पत्करावयास पाहिजे होती व ती बँकेचे व्यवहारास तोशीस लागूं न देतां बँकेच्या संचालक मंडळींनीं वैयक्तिक जबाबदारीवर पत्करली. महाराष्ट्राचा आर्थिक इतिहास कधीं काळीं लिहिला गेल्यास त्यांत हा व्यवहार क्रांतिकारक म्हणून सुवर्णाक्षरांनींच नमूद केला जाईल अशी मला खात्री वाटते. या मोठ्या व्यवहाराशिवाय इतरही, जे कांहीं व्यवहार आपल्या बँकेनें केले त्यामुळें निरनिराळ्या कारखान्यांस डोकें वर काढण्यास मदत झाली आहे हेंही नमूद करण्यास मला आनंद वाटत आहे.

तथापि, आपण लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, बँकेच्या यशाची व उपयुक्ततेची खरी कसोटी युद्धोत्तर कालांत ठरणार आहे. युद्ध परिस्थितींत हिंदुस्थानांत अनेक नवीन धंदे निघाले पण महाराष्ट्र औद्योगिक क्षेत्रांत आधींच मागासलेला व व्यापारी मनोवृत्ति नसलेला असल्यामुळें युद्धामुळें मिळालेल्या संधीचा मुंबई सोडल्यास महाराष्ट्रानें फारच थोडा उपयोग करून घेतल्याचें दिसून येतें.

राजकीय कोंडी फुटून आर्थिक स्वातंत्र्य हिंदुस्थानचे वाट्यास न आल्यास युद्धोत्तरकालीं जागतिक चढाओढीस व विशेषतः ब्रिटिश व अमेरिकन मालाचे चढाओढीस हिंदी धंद्यास तोंड द्यावें लागणार आहे व तें विशेषतः महाराष्ट्रांतील छोट्या व असंघटित धंद्यास विशेष जाचण्याचा संभव आहे. अशा कठीण वेळीं महाराष्ट्रांतील धंद्यास औद्योगिक बँकेची खरी नड भासणार आहे व त्याकरतां आपल्या बँकेनें थोडीफार तयारी करून ठेवणें जरूर आहे. चालूं वर्षाच्या नफ्याच्या वाटणीकडे आपण लक्ष दिल्यास अशी तरतूद आपण अंशतः कां होईना करून ठेवीत आहों हें आपल्या लक्षांत येईल.

ए. बी. सी. कॉइल्स
( डासांच्या उदबत्त्या )
बॉक्समध्यें १२. बॉक्स किं. १० आणे.
रात्रभर जळतात.
लायसॉफ
केसांतील उवांवर आश्चर्यकारक शोध.
उवा १ तासांत मरतात
बाटली किं. १ रु. ★ दोन वेळां उपयोग.
दि मायोरा केमिकल कं. लि.
— टिळक रोड, पुणें २. —

पुण्यांतील
आदर्श निवासस्थान व भोजनालय
छाया लॉजिंग व बोर्डिंग हाउस
बुधवार चौक, पुणें २.

विमेदार नि हवाई हल्ला
शत्रुराष्ट्राकडून हवाई हल्ला अगर तत्सम उपद्रव पापासून बिनलढाऊ नागरिकांच्या जीविताला येणाऱ्या धोक्याचा समावेश विमा पॉलिसीच्या अटींत होतो काय व त्यासाठी जादा प्रिमिअम भरावा लागेल काय ! असा प्रश्न साहजिकच नागरिकांमध्यें चर्चिला जात आहे.
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनीच्या
विमा पॉलिसीमध्यें हवाई हल्ल्यामुळें जीविताला होणाऱ्या अपायाचा अंतर्भाव होतो त्याकरितां जादा प्रिमिअम नाहीं.
तरी विलंब न लावतां—
तुमचा नि तुमच्या आप्तेष्टांचा विमा
ट्रस्ट ऑफ इंडिया
विमा कंपनींतच उतरा.
अध्यक्ष:—श्रीमंत सरदार जगन्नाथ महाराज पंडित
माहितीपत्रकें विनामूल्य पाठवूं
ट्रस्ट ऑफ इंडिया विमा कं. लि., लक्ष्मी रोड, पुणें २ | वि. ह. देशमुख, बी. ए. जनरल मॅनेजर

आंधळा अंपायर !

# WHAT'S THAT?

कौरवपांडवांच्या द्यूताचा मामला चालू असतां महात्मा विदुरांनीं कपटी शकुनीमामाचें कारस्थान हेरून खुद्द धृतराष्ट्रांस हा सवाल केला ! पण तो बिचारा काय उत्तर देणार ? आधींच आंधळा ! त्यांतून पुत्रमोहानें मोहांध !!

रॉयल रत्न १८ वें मराठी भाषेंत

# ★ महात्मा विदुर ★

दिग्दर्शक:—रेजिसॉर, पार्श्वनाथ आळतेकर  कला:—बाबूराव पेंटर

भूमिका:—कै. विष्णुपंत पागनीस, दुर्गा खोटे, मनोहर घटवाई, नायमपल्ली, प्रल्हाद, सीता अल्हेरी.

**आर्यन, पुणें** दररोज तीन खेळ दुपारीं ३। ६॥ व १० वाजतां दर रविवारीं सकाळीं १० वा. जादा खेळ **८ वा आठवडा**

## मुंबईच्या मार्गावर !

मुंबईत "रामराज्या"चा रौप्यसमारंभ साजरा होत आहे. इतर शहरें मुंबईचाच मार्ग आक्रमण करीत आहेत.

## —१५ वा आठवडा—

प्रकाश पिक्चर्सचा पौराणिक मराठी बोलपट

# रामराज्य

दिग्दर्शक:—विजय भट्ट.

भूमिका:—शोभना, समर्थ, चंद्रकांत, काळे, सोहनी.

## मिनर्व्हा, पुणें

रोज फक्त दोन खेळ

६। व १० वाजतां

दर शनि. रवि. सोम. व इतर सुटींचे दिवशीं जादा खेळ दुपारीं २॥ वाजतां

## आडाचं पानी

## लई खोल !

कविवर्यांची प्रतिभा जागृत करणाऱ्या पनघटावरील पनिहारीस तिच्या मैत्रिणीनें इषारा दिला कीं बाई गं—

" लचक न जाना......

......घडा है तेरा भारी "

## —ग्लोब पुणें—

शनिवार ता. ५ पासून सुरू—

प्रकाश पिक्चर्सचा

# पनघट

भूमिका:—रत्नमाला, उमाकांत, जीवन

दररोज ६॥ व १० वाजतां

शनि. रवि. सोम. दुपारीं ३॥ वाजतां जादा खेळ.

दररोज सकाळीं १० ते १२ व दुपारीं ४ चे पुढें तिकिटें रिझर्व्ह केलीं जातील.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.